"स्थानीय व्यवस्थापन समिती"ची सभा दिनांक १४ डिसेंबर २०१९

आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या स्थानीय व्यवस्थापन समितीची सभा दिनांक १४ डिसेंबर २०१९, शनिवारी प्रातः १०.०० वाजता महारोगी सेवा समिती वरोराच्या मध्यवर्ती कार्यालय आनंदवन येथे माननीय डॉ. विकासभाऊ आमटे यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली.

या सभेस पुढील गणमान्य सभासद उपस्थित होते.

| अ.क्रं | सर्वश्री शुभनाम | पद | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| १ | आदरणीय डॉ. विकासभाऊ आमटे | अध्यक्ष | [signature] |
| २ | डॉ. शितल करजगी-आमटे मॅडम | सदस्य | [signature] |
| ३ | श्री गौतम शिरिष करजगी सर | सदस्य | [signature] |
| ४ | डॉ. दिलीप रामकृष्ण पेठावे | सदस्य | [signature] |
| ५ | डॉ. विजय गोविंद पोळ | सदस्य | [signature] |
| ६ | श्री सुधाकर विठोबाजी कडू | सदस्य | [signature] |
| ७ | प्रा. विजय शंकरराव धाबर्डे | शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| ८ | डॉ. संजय नारायणराव साबळे | शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| ९ | प्रा. बबन बळीरामजी अवथडे | शिक्षक प्रतिनिधी | [signature] |
| १० | श्री. हरी फकुजी खुडसंगे | शिक्षकेत्तर प्रतिनिधी | [signature] |
| ११ | डॉ. मृणाल चंद्रकांतराव काळे. | प्राचार्य तथा सचिव स्थानीय व्यवस्थापन समिती. | [signature] |

– सभाध्यक्षपदी निवड –

उपस्थित गणमान्य सभासदांनी एकमताने सभाध्यक्ष पदी आदरणीय डॉ. विकासभाऊ आमटे यांची निवड केली.

– स्वागत व ऋण निर्देश –

डॉ. मृणाल चंद्रकांत काळे, प्राचार्य आनंद निकेतन महाविद्यालय व सचिव, स्थानीय व्यवस्थापन समिती, यांनी शब्दसुमनांनी उपस्थितांचे स्वागत केले. श्रद्धेय स्वर्गिय बाबा व सौ. ताईंच्या पुण्यस्मरणाने प्रारंभ झाला.

आमचे प्रेरणास्थान डॉ. विकासभाऊ यांचे प्रेरणेने, डॉ. शितलजी, श्रीमान गौतम करजगी साहेब या उभयतांच्या कुशल मार्गदर्शन व सक्रीय सहभागाने, सांप्रत महाविद्यालयाची नेत्रदिपक प्रगती होत आहे. पूर्वी अनपेक्षीत असलेल्या असलेले विस्तारकार्य वेगाने होत आहे. यामुळे महाविद्यालयास नवचैतन्य प्राप्त होत आहे हा भास नसून वास्तवीकता आहे. आपली प्रेरणा, मार्गदर्शन व सक्रीय सहभाग यामुळे महाविद्यालय सर्वोच्च शिखर गाठेल या बाबत सर्व निःशंक आहेत.

व्यवस्थापनाने सत्र २०१८-२०१९ मध्ये रु.१३,३९,१९२/- मूल्यांच्या पायाभूत सुविधा तसेच रु.३१,१०,४३८/- संरक्षक भिंत, रु.३८,५४,३५१/- ईमारत बांधकाम व नवीन अभ्यासक्रमास हमी करिता रु.५,००,०००/- मुदत ठेव व चालू सत्रात आता पावेतो अंदाजे २,००,००,०००/- रुपये प्रत्यक्ष आर्थिक मदत केली आहे. आपले कुशल मार्गदर्शन, सक्रीय सहभाग निरंतर लाभेल अशी अपेक्षा बाळगतो. आपले मनःपुर्वक धन्यवाद.

प्राचार्य आनंद निकेतन महाविद्यालय यांचे कुशल नेतृत्व, कल्पकता, दूरदृष्टी या अंगभूत गुणांनी महाविद्यालय स्वतःचे स्तरावर सर्वांगीण प्रगती पथावर आहे. नवीन विषयाचे पदव्युत्तरवर्ग, कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम, विद्यापीठ संशोधन केंद्र CHLR मान्यता प्राप्त आहे. यंदा विद्यापिठाच्या गुणवत्ता यादीत विज्ञान स्नातक व वाणिज्य स्नातक प्रत्येकी २ व पदव्युत्तर विभागात गणीत विषयात १ विद्यार्थी मानाचे स्थान मिळवले आहे. शैक्षणीक गुणवत्ते सोबत इतर सांस्कृतिक व क्रिडा प्रकारात अग्रेसर होत आहे. अश्वमेध स्पर्धेत १ विद्यार्थिनी समाविष्ट आहे.

आपले मनःपूर्वक आभार.

ठराव क्रं. १. मागील सभेच्या ईतिवृत्तास मंजूरी देणे.

मागील सभा दिनांक १ सप्टेंबर २०१८ रोजी म.से.स. वरोराच्या मुख्य कार्यालयात डॉ. विकास भाऊ आमटे यांचे अध्यक्षते खाली संपन्न झाली होती. सदर सभेच्या इतिवृत्त

"मागील सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर"

ठराव क्रं. २. आर्थिक वर्ष २०१८-२०१९ चे आयव्यय पत्रकास मंजूरी देणे.

आर्थिक वर्ष २०१८-२०१९ चे अंकेक्षित लेखे 'आयव्यय, जमाखर्च पत्रक व ताळेबंद' सभेसमोर सादर केले. विचार विनिमय, सुचना, चर्चे अंती मान्यता प्राप्त झाली.

"आर्थिक वर्ष २०१८-२०१९ चे आयव्यय पत्रक सर्वानुमते मंजूर"

ठराव क्रं. ३ अंदाजपत्रक २०१९-२० ला मंजूरी देणे.

आर्थिक वर्ष २०१९-२०२० चे अंदाजपत्रक सभे समोर सादर केले. यावर सर्वांगीण चर्चा झाली.

"आर्थिक वर्ष २०१९-२०२० चे अंदाजपत्रक सर्वानुमते मंजूर"

ठराव क्रं. ४ वेतन व वेतन विषयक कार्यवाहीस मंजूरी देणे.

(१) सेवा निवृत्ती प्रकरणे

चालू सत्रात पुढील कर्मचारी सेवा निवृत्त झाले.

1. श्री रमेश भाऊराव तराळे, ग्रंथालय परिचर सेवा निवृत्ती दिनांक 30 एप्रिल २०१९
2. श्री मनोहर बालाजी सोनटक्के, प्रयोगशाळा परिचर —"— 30 जून २०१९
3. श्री बापुराव महादेव लांडे —"— 30 नोव्हेंबर २०१९

महाविद्यालयाने आपले स्तरावरील कार्यवाही पूर्ण केली. निवृत्ती वेतन सुरू. अंतीम प्रदाने प्राप्त.

P.Vespatil

स्वाक्षरी
अध्यक्ष
स्थानिय व्यवस्थापन समिती

Dhale

स्वाक्षरी
प्राचार्य / सचिव
आ. नि. म / स्था. व्य. समिति.